DIR(FIN) 1919 Date 15/X/17

765 15/10/10

MD (Mahagenco) No. 5181 Dt. 13/10/10

महानिर्मिती कंपनीच्या भुसावळ जि. जळगांव येथे १x ६६० क्षमतेच्या कोळशावर आधारित सुपरक्रिटीकल औष्णिक विद्युत बदली प्रकल्पाच्या उभारणीस व त्याकरिता लागणा-या भागभांडवलास मंजूरी देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्र. प्रकल्प-२०१०/प्र.क्र.३/ऊर्जा-४,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,दिनांक ५ ऑक्टोबर, २०१०

वाचा:- १) शासन निर्णय क्र. प्रकल्प-२००८/प्र.क्र.१४९१/ऊर्जा-४, दिनांक २६ मे,२००९
२)व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित, यांचे पत्र क्रमांक: डीजी / बीसीएल.आरइपीटी / १x ६६० एम डब्लू/ ५७२३, दि. ३० डिसेंबर , २००९

**प्रस्तावना:** सध्या राज्याची वीज निर्मितीची स्थापित क्षमता ९९९६ मे.वॅ. आहे. केंद्राचा हिस्सा धरुन वीजेची एकूण उपलब्धता वर्ष २००९-१० मध्ये अंदाजे १०४१२ मे.वॅ. एवढी होती. राज्याची सन २००९-१० ची कमाल मागणी १५६६९ मे.वॅ. एवढी होती. या वर्षी अलिकडच्या काळात कमाल मागणीच्या वेळी सुमारे ४५०० ते ५००० मे.वॅ. ची तूट भासत आहे. राज्यातील मागणी व पुरवठा यातील समन्वय साधण्यासाठी स्थापित क्षमता वाढविणे गरजेचे आहे. जेणे करुन सध्याचे भारनियमन कमी करण्यास मदत होईल.

वीज निर्मिती क्षमतेमध्ये वाढ होण्याच्यादृष्टीने शासन निर्णय क्र. प्रकल्प-२००८/प्र.क्र.१४९१/ऊर्जा-४, दिनांक २६ मे,२००९ अन्वये पारस व भुसावळ येथे प्रत्येकी १ x २५० मे.वॅ. क्षमतेच्या आष्णिक विद्युत बदली प्रकल्पाच्या उभारणीस व त्याकरिता लागणाऱ्या भागभांडवलास मान्यता देण्यात आली होती.तथापी पारस येथे प्रकल्पासाठी लागणारी जागा संपादन करण्यासाठी येणाऱ्या अडचणी विचारात घेऊन महानिर्मितीच्या संचालक मंडळाने सदर संच तसेच भुसावळ येथील संच या दोन्ही संचाऐवजी महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनीने भुसावळ जि. जळगांव येथे १ x ६६० मे.वॅ. क्षमतेचा कोळशावर आधारित सुपरक्रिटीकल संच (संच क्रमांक ६) उभारण्याचे प्रस्तावित केले आहे. सदर नवीन संच उभारण्याच्या प्रकल्पास व त्याकरिता लागणा-या भागभांडवलास तसेच जमीन संपादन करण्यास मंजूरी देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. दि. २५ ऑगस्ट, २०१० रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत सदर प्रस्तावावर चर्चा होऊन खालील निर्णय घेण्यात आला.

**शासन निर्णय:-** महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनीने (महानिर्मिती ) सादर केलेल्या प्रस्तावावर शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतले आहेत.

१) भुसावळ जि. जळगांव येथे १ x ६६० मे.वॅ. क्षमतेच्या कोळशावर आधारित सुपरक्रिटीकल औष्णिक विद्युत बदली प्रकल्प उभारणीसाठी, तसेच त्यासाठी लागणाऱ्या एकूण अंदाजित खर्च रु. ४२९० कोटीस मान्यता देण्यात आली आहे.

DIR(FIN)



आवक

२) सदर प्रकल्पासाठी कर्ज व भागभांडवलाचे प्रमाण ८०:२० असे राहील.यातील ८०% कर्ज हे पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन / ग्रामिण विद्युतीकरण महामंडळ / कमीत कमी व्याज आकारणाऱ्या सहयोगी बँकांच्याकडून कर्ज रुपाने घेण्यास महानिर्मिती कंपनीस मान्यती देण्यात आली आहे .

३) उर्वरित २०% रक्कम म्हणजेच रुपये ८५८ कोटी शासनाचे भागभांडवल म्हणून महानिर्मिती कंपनीस उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यापैकी सन २०१०-११ या वर्षाकरिता रु. ८ कोटी, सन २०११-१२ करिता रु. १७० कोटी ,सन २०१२-१३ करिता रु. १७० कोटी , सन २०१३-१४ करिता रु. १७० कोटी , सन २०१४-१५ करिता रु. १७० कोटी , सन २०१५-१६ करिता रु. १७० कोटी , एवढा नियतव्यय विभागास अर्थसंकल्पीय तरतुदीमधून मंजूर करुन देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

४) भागभांडवलापोटी शासनाकडून द्यावयाची रक्कम प्रकल्पावर प्रत्यक्ष झालेल्या खर्चाच्या प्रमाणात व मूळ प्रकल्प किंमतीच्या मर्यादित राहील.

५) भागभांडवलाच्या रक्कमेवर महानिर्मिती कंपनीकडून १४% दराने लाभांश शासनास देय राहील.

६) प्रकल्पातून वीज निर्मितीची सुरुवात (अंदाजे) जून २०१५ पासून होईल.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१०५५/ व्यय-१६/१०, दिनांक २४ सप्टेंबर २०१०अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(स.व्यं.झणझणे)
कार्यासन अधिकारी

प्रति,

- राज्यपालांचे सचिव
- मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव
- उप मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव
- सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
- मुख्य सचिवांचे स्वीय सहाय्यक
- प्रधान सचिव ,वित्त विभाग
- प्रधान सचिव, नियोजन विभाग
- महालेखापाल ( लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई ३ ४०० ०२०
- महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता)-२,महाराष्ट्र, मुंबई-४०० ०२०
- महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता)-२,महाराष्ट्र, नागपूर
- महालेखापाल ( लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, नागपूर
- अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१

- अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
- निवासी लेखा अधिकारी, मुंबई
- संचालक लेखा व कोषागारे, मुंबई
- मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन,मुंबई
- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, सुत्रधार कंपनी मर्या., मुंबई.
- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, वितरण कंपनी मर्या., मुंबई.
- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, निर्मिती कंपनी मर्या., मुंबई.
- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, पारेषण कंपनी मर्या., मुंबई.
- वित्त विभाग (व्यय-१६)
- नियोजन विभाग ( कार्यासन-१४६१)
- ऊर्जा विभागातील सर्व कार्यासन
- निवडनस्ती

---------

Dir(F) / Dir (Proj)